**आकाशवाणी मुंबई**

**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

**ठळक बातम्या**

राज्यात सर्वत्र ढोलताशाच्या गजरात गणरायाचं आगमन, परंपरा जपतानाच आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यावर भर

पीएम स्वनिधी योजनेच्या मुदतवाढीला आणि अतिरीक्त कर्ज द्यायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना एक दिवसासाठी आझाद मैदानावर आंदोलन करायला मुंबई पोलिसांची सशर्त परवानगी

**आणि**

गडचिरोली जिल्ह्यात पोलीस चकमकीत चार नक्षलवादी ठार

**<><><><><>**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. घरोघरी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने गणरायाची प्रतिष्ठापना झाली. **राज्यात** सर्वत्र पारंपरिक पद्धतीनं स्थानिक वैशिष्ट्यांसह आणि नवनवीन कल्पना राबवून मंगलमूर्तींचा हा उत्सव साजरा होत आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी***

ढोलताशांचा गजर आणि गणपतीबाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईसह राज्याच्या विविध भागांत गणपतीबाप्पाचं आगमन झालं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ ऑगस्ट २०२५ - बुधवार

**राज्यपाल** सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करुन पूजा केली. यंदाची राजभवनातली शाडूची मूर्ती नाशिक कारागृहातल्या कैद्यांनी तयार केली आहे.

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडनवीस यांनी मुंबईत वर्षा निवासस्थानी श्रींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करुन पूजा केली. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळो आणि राज्यात सुख शांती नांदो अशी प्रार्थना त्यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. फडनवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या दादर इथल्या निवासस्थानी भेट दिली आणि गणपतीचं दर्शन घेतलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं.

**मुंबई**त आज सुमारे बारा हजार सार्वजनिक, तर सव्वा लाख घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना झाली. गणेशोत्सव सुरक्षितरीत्या साजरा व्हावा, यासाठी प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. मेट्रो, बेस्ट तर्फे भाविकांसाठी विशेष सोय करण्यात आली आहे.

**पुण्यातही** आज पारंपरिक उत्साहानं मानाच्या पाच गणपतींसह इतर विविध गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना झाली. गणेशोत्सवाची आरास पाहण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या सोयीसाठी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानकांवरुन उशिरापर्यंत मेट्रो सेवा सुरु राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे.

**नागपूर**वासीयांचं आराध्य दैवत टेकडी गणेशाचीही आज भक्तिपूर्ण वातावरणात प्रतिष्ठापना झाली.

राज्य शासनाच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पनेवर आधारित गणेश मूर्तीदान उपक्रम **पालघर** नगरपरिषदेकडून राबवण्यात येणार आहे. तर **वसई विरार** महानगरपालिकेनं पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा आयोजित केली आहे.

**नांदेड** जिल्ह्यात शहरी भागात १ हजार सार्वजनिक, तर ग्रामीण भागात तीन हजाराहून अधिक मंडळाकडून श्रींची स्थापना करण्यात आली. **देगलूर** इथं पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना करण्यात आली. **बीड** शहरासह जिल्हाभरामध्ये बालगोपाळांसह ज्येष्ठांनी बाप्पांचं उत्साहाने स्वागत केलं. **लातूर** शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी आज गणरायाचं मोठ्या जल्लोषात स्वागत झालं. **हिंगोली**त सार्वजनिक मंडळांनी ढोलताशाच्या गजरात श्रीगणेशाची प्रतिष्ठापना केली.

**नाशिक**मध्ये यंदा चौदाशे मंडळांनी गणरायाची स्थापना केली आहे. गणेशभक्तांनी आज भर पावसात गणरायाचं स्वागत केलं. **नंदुरबार**मधला पहिला मानाचा गणपती असलेल्या श्रीमंत दादा गणपती आणि श्रीमंत बाबा गणपती यांची आज मोठ्या भक्तीभावात स्थापना करण्यात आली. **धुळे** शहरात बहुतांश ठिकाणी कालच मंडपात विराजमान झालेल्या गणेशमूर्तींची आज शास्त्रोक्त पद्धतीनं प्राणप्रतिष्ठा झाली. आहे. **बुलडाणा** जिल्ह्यातही गणेशोत्सवाला थाटामाटात प्रारंभ झाला. **जळगाव** जिल्ह्याच्या १६० गावांमध्ये यंदा 'एक गाव, एक गणपती' हा उपक्रम राबवला जात आहे.

**अहिल्यानगर** शहराचं ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिरात आज भक्तिभावाने 'श्रीं'ची प्रतिष्ठापना झाली. जनसामान्यांबरोबरच विविध क्षेत्रातले नामवंत मान्यवर उत्साहाने या सणाचा आनंद लुटत आहेत.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातही सर्वत्र गणरायाचं आगमन झालं. रत्नागिरीतल्या टिळक आळी गणेशोत्सव मंडळाच्या शताब्दीनिमित्त यंदा विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. शहराजवळच्या कर्ला-आंबेशेत गावातल्या घरगुती गणपतींच्या मिरवणुकीचं हे चाळिसावं वर्ष आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही गणेशोत्सवाच्या चैतन्यपर्वाला आज भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. पहाटे तीन वाजल्यापासूनच गणेशपूजनाला सुरुवात झाली. मात्र, पावसानं हजेरी लावल्यानं गणेशभक्तांच्या आनंदावर काहीसं विरजण पडलं.

<><><><>

पीएम स्वनिधी अर्थात प्रधानमंत्री पथविक्रेते आत्मनिर्भर निधी योजनेच्या पुनर्रचनेला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. त्यानुसार पहिल्यांदा कर्ज घेणाऱ्यांना १० ऐवजी १५ हजार आणि दुसऱ्यांदा कर्ज घेणाऱ्यांना २० हजार ऐवजी २५ हजार रुपये कर्ज मिळेल. तिसऱ्यांदा कर्ज घेणाऱ्यांना मात्र ५० हजार रुपयेच कर्ज दिलं जाईल. या पुनर्रचनेमुळे ५० लाख नव्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळेल. आणखी अनेक शहरं आणि गावांमध्ये ही योजना राबवली जाणार आहे. या योजनेअंतर्गत कर्ज वितरणाची मुदत आता ३१ मार्च २०३० पर्यंत वाढवली आहे. या योजनेसाठी ७ हजार ३३२ कोटी रुपये इतकी तरतूद आहे.

२०३० मधल्या राष्ट्रकुल स्पर्धा भारतात आयोजित करण्यासाठी दावा दाखल करायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. अमदाबादमध्ये या स्पर्धांचं आयोजन करण्याचा प्रस्ताव आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीनं गुजरातमध्ये कच्छपर्यंत नवा रेल्वेमार्ग आणि कर्नाटक, तेलंगणा, बिहार आणि आसाममधल्या रे◌ेल्वेमार्गांच्या बहुपदरीकरणालाही मंजुरी दिली.

<><><><>

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मुंबई पोलिसांनी सशर्त परवानगी दिली आहे. त्यांना केवळ एका दिवसासाठी आणि जास्तीत जास्त ५ हजार आंदोलकांसह आझाद मैदानावर

सकाळी ९ ते संध्याकाळी ६ दरम्यान आंदोलन करता येईल, असं मुंबई पोलिसांनी कळवलं आहे.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथून मुंबईकडे मोर्चा निघाला. यात मराठवाड्यातले हजारो नागरिक सहभागी झाले आहेत. मराठा आरक्षणविषयी मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूरध्वनीवरून चर्चेसाठी आमंत्रण दिल्याचं मनोज जरांगे यांनी वार्ताहरांना सांगितलं. सरकारच्या शिष्टमंडळासोबत मात्र सर्वांसमोर चर्चा करण्याची तयारी जरांगे यांनी दाखवली.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड इथं कोपर्शी गावाजवळ आज पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. यात तीन महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. नक्षलवादी काही घातपात करायच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती, त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी या भागात मोहीम सुरू केली होती. आज नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबाराच्या प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चौघेजण ठार झाले. आठ तास ही चकमक चालली. पोलिसांनी घटनास्थळावरून काही शस्त्रं जप्त केली आहेत. मृत नक्षलवाद्यांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वसई तालुक्यातल्या नारंगी रोडजवळ चार मजली इमारतीचा काही भाग जवळच्या चाळीवर कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या दुर्घटनेत अनेक रहिवासी ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. वसई - विरार महानगरपालिका, अग्निशामक दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या मदत आणि बचाव कार्य करत आहेत.

आतापर्यंत अकरा जणांना बाहेर काढण्यात आलं असून आणखी ६ ते ७ जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता आहे.

या दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या बिल्डर विरुद्ध महानगरपालिकेनं विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. ही इमारत बेकायदा होती आणि स्ट्रक्चरल ऑडिटसाठी त्यांना महापालिकेनं नोटीस पाठवली होती, असं वसई-विरार महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आहे. विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती विपुल पंचोली यांचीही नेमणूक सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे पुढचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या नावाची शिफारस न्यायवृंदानं केली आहे.

**<><><><><>**

उद्या कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

.